# तालयोगी नावाचे घराणे

- उल्हास कशाळकर, पुणे

भारतीय कला, विशेषतः "संगीत" ही कला परंपरागत अशी आहे. ही विद्या गुरुकुलाच्या माध्यमातून पुढील पिढीला प्राप्त होत असते. आजपर्यंत अनेक गुरूंनी आपली विद्या शिष्यांना प्रदान करून त्यातून खूप उच्च दर्जाचे कलाकार निर्माण केले आहेत. शालेय शिक्षण पद्धती आणि गुरुकुल पद्धतीत शिकवणं आणि घडवणं हा महत्त्वाचा फरक आहे. शिकलेला व्यक्ती जे शिकवले अगदी तसे सादर करू शकतो पण घडवलेला व्यक्ती गुरूकडून मिळालेली विद्या आत्मसात करून त्याला आपल्या प्रतिभेने पुढे विकसित करून रसिकांसमोर सादर करत असतो. यामुळेच अनेक उच्च प्रतीचे कलाकार तयार झाले आहेत .

सुरेशजींचा या गुरुकुल पद्धतीवर ठाम विश्वास आहे. अगदी पूर्वीपासून म्हणजे मुंबईला गोरेगावला ते राहत होते तेंव्हापासून ते गुरुकुलाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांना घडवत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला घडवताना त्यांनी प्रचंड मेहनत घेतलेली आहे. या गुरु शिष्य परंपरे प्रमाणे ते आजही विद्यार्थ्यांना शिकवतात. यातूनच " तालयोगी आश्रमाची " संकल्पना पुढे आली असावी. विद्यार्थ्यांना कसे घडवायचे ही "कला" सुरेशजींना अवगत आहे, नव्हे ते त्यांना वरदानच आहे. अनेक मोठे कलाकार आहेत पण त्यांना विद्यार्थ्यांना शिकवता येईलच असे नाही. सुरेश जी एक वेगळेच मिश्रण आहे. ते कलाकार आहेतच त्याबरोबरच ते चांगले शिक्षक आहेत, गुरु आहेत. शिकवताना नवनवीन प्रयोग करण्याची त्यांची तयारी असते. त्यातूनच त्यांनी त्यांची एक वेगळी शैली निर्माण केली आहे, "तालयात्रा" सारखा एक मोठा प्रयोग ते सादर करतात त्यावेळी त्यात संपूर्ण संगीताचे सादरीकरण गीत, वाद्य व नृत्याच्या माध्यमातून करत असतात. त्यात त्यांचा खूप सूक्ष्म विचार आहे. तालयात्रे सारखा सर्वगुणसंपन्न कार्यक्रम ते अशा पद्धतीने सादर करतात की श्रोते मंत्रमुग्ध होऊन जातात. यात तालाबरोबरच गाणं आहे, पश्चिमात्य व पौर्वात्य वाद्यांचा

संगम आहे ,नृत्य आहे, त्यामुळे प्रेक्षकांना तालयात्रा हा प्रयोग खूप भावतो.

प्रत्येक शिष्याला समोर बसून शिकवण्याची त्यांची पद्धत आहे. आलेल्या नवीन शिष्याला देखील ते स्वतःच शिकवतात. वरिष्ठ शिष्याच्या साहाय्याने ते कधीही नवीन शिष्याला मार्गदर्शन करीत नाहीत. कारण प्रत्येक मुलाकडे वेग वेगळी प्रतिभा असते आणि मग एकच बंदिश दहा मुलांमध्ये वेगवेगळ्या वैशिष्ट्याने वाजू शकते हे त्यांना माहिती आहे. पूर्वापार चालत आलेली तबला वादन शैली होती त्याला एक वेगळी दिशा देण्याचे काम सुरेशजींनी केले. त्यांनी स्वतः अनेक गुरूंकडे तालीम घेतली, विविध घराण्यांची विद्या प्राप्त करून घेतली. जसे पं. विनायकराव घांग्रेकर यांच्याकडे ते गेले, नागेशकर गुरुजी, कर्नाटकातील विद्वान ईश्वरनजी अशा अनेक गुरूंकडून त्यांनी विद्या प्राप्त करून घेतली. या सर्व गोष्टींमुळे आपल्याकडच्या पारंपारिक तबल्याला त्यांनी वेगळा आयाम दिला, नवी दिशा दिली.

लघु लयकारी सारखे सूक्ष्म अवघड प्रकार दक्षिणेकडील संगीतात जास्त आहेत. आपल्या कडील लयकारीचा अभ्यास आणि दाक्षिणात्य संगीतातील लयकरीचा अभ्यास याचे मिश्रण करून त्यांनी स्वतःची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. त्यामुळे पूर्वापार चालत आलेला तबला लयकारीच्या बाबतीत अधिक सूक्ष्म व प्रगल्भते कडे नेण्याचे काम सुरेशजींनी केले. आज लयकरीच्या दुनियेत जे विविध प्रयोग केले जातात त्यात सुरेशजींचे मोठे योगदान आहे. त्यामुळे तबला सोलो बरोबरच साथ संगत ,नृत्य किंवा आपण फ्युजनचे जे प्रकार पाहतो त्यात लयकारीचे जे विविध प्रयोग केले जातात त्याचा पाया सुरेशजींनी रचला असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या गाण्याच्या संगती सुद्धा आपण ज्यावेळेस ऐकतो त्यातही विद्यार्थ्यांना खूप शिकण्यासारखे असते. कुठले गाणे कसे वाजवले पाहिजे याचा धडा ते घालून देतात.

सुरेशजींना तबल्याचे चांगले संस्कार मिळाले. त्यांची सूक्ष्म निरीक्षण करण्याची दृष्टी असल्यामुळे आमचे गुरुजी पं. गजानन राव जोशी यांच्या कडून सुद्धा अनेक बारकावे त्यांना

कळाले. नंतर निवृत्ती बुवा सरनाईक यांच्याकडे सुद्धा त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या मुंबईच्या वास्तव्यामुळे आग्रा, जयपूर घराण्यातील थोर कलाकारांची तालीम त्यांना जवळून अनुभवायला मिळाली. गाण्याची साथ संगत करताना कुठल्या गायकीत किती वाजवायचे, कुठे वाजवले जाते, नेमकी वाजवण्याची जागा कशी आहे, जे गाणं चालले आहे त्याच्याशी अनुरूप दाखवणारे वादन आहे की नाही, गाण्याची साथसंगत करताना जेवढे आपल्या कडे मॅटर आहे तेवढे वाजवणे व टाळ्या घेणे हे नसावे. काय विषय चालला आहे, त्याच्याशी साम्य दाखवणारे तबलावादन असावे. हे स-प्रयोग सुरेशजींनी दाखवून दिले.

संगतकाराला गाणं समजायला हवं. सुरेशजींना उत्तम गाणं समजतं, त्यांना गाण्याच्या अनेक बंदिशी पाठ आहेत. राग माहिती आहेत. मोठमोठ्या लोकांच्या सहवासात राहून त्यांना अनेक बंदिशी मिळाल्या. त्यांच्या तालयात्रा या कार्यक्रमात ते स्वतः काही बंदिशी गाऊन दाखवतात. व्यासपीठावर गाणं ऐकणं वेगळं आणि एखाद्याची तालीम ऐकणे वेगळं. तालमीमध्ये तो गायक त्या रागाची फोड करून सांगत असतो. त्या रागाचा विस्तार कसा करायचा, कोणता स्वर किती वेळ त्या रागात आहे, इत्यादी गोष्टी अनुभवायला मिळतात. त्यामुळे गायकी अधिक स्पष्ट कळते. याचा त्यांना त्यांच्या साथ संगतीत खूप उपयोग झाला.

पूर्वी वाद्यांना साथ सांगत करणारे कलाकार महाराष्ट्रात कमी होते. गाण्याची साथसंगत करणारे किंवा एकल तबला वादन करणारे बरेच कलाकार होते. पण सतार, सरोद, बासरी यासारख्या वाद्यांबरोबर साथसंगत करणारे कलाकार कमी होते. ही वादक मंडळी सुरेशजींनी तयार केली.  आज अनेक नामवंत कलाकार तबला साथीला सुरेशजींच्या शिष्यांना पसंती देतात. अगदी पंडित शिवकुमार शर्मा पंडित,  हरिप्रसाद चौरासिया, उस्ताद अमजद अली खाँ साहेब यांच्याबरोबरही सुरेशजींचे अनेक शिष्य तयारीने साथ करतात. त्या दर्जाचे शिष्य घडवणे हे सुरेशजींचे भारतीय संगीतासाठी खूप मोठे योगदान आहे. अशा उच्च दर्जाच्या तबलावादकांची एक नवीन पिढीच त्यांनी तयार केली.

मला तर बरेचदा लोक सांगायचे आम्हाला सुरेशजीच पाहिजे तुमच्यासोबत. कारण विशिष्ट घराण्याच्या गाण्याबरोबर कशी संगत पाहिजे हे त्यांना चांगलं माहिती आहे. तीनताल तर सगळेच वाजतात पण जयपूरच्या गायकी बरोबर तो कसा वाजवतात, ग्वाल्हेरच्या गायकीबरोबर कसा वाजवतात इत्यादी त्यांना बरोबर माहिती आहे.

त्यांना वाद्या विषयी खूप प्रेम आहे. वाद्यनिर्मितीबाबत ते फार जागरूक असतात. वाद्य कसे ठेवले पाहिजे ते सुरेल लागलेच पाहिजे, अशा वरवर वाटणार्या छोट्या छोट्या गोष्टी, पण खूप महत्त्वाच्या असतात, त्याकडे त्यांचे विशेष लक्ष असते. तबला मेकर्स कडे स्वतः जाऊन चार चार तास बसून त्यांनी तबला बनवून घेतलेला आहे.

सुरेशजींचा व माझा ऋणानुबंध १९७५ पासूनचा. त्यांच्या पत्नी पद्माताई माझ्या गुरु भगिनी. आमचे भाऊ अरुण कशाळकर यांच्यापासून सुरेशजींचे जुने ऋणानुबंध आहेत घरोबा आहे आणि आमची जवळ जवळ ५० वर्षांची मैत्री हि समाजाला देखील परिचित आहे. एकदा तर अशी गंमत झाली की सत्कार समारंभात त्यांचे नाव "सुरेश कशाळकर" तर माझे नाव "उल्हास तळवकर" असे घेतले गेले इतकी आमची घनिष्ठ मैत्री आहे. मी गोरेगावला त्यांच्या घरी अनेकदा गेलो आहे.पण प्रत्येक भेटीत आमच्या संगीताच्याच चर्चा चालायच्या. इतर विषयावर आम्ही कधी बोलत बसलो असे कधी झाले नाही. आम्ही मैफिलीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी प्रवास केलेला आहे व करत असतो. त्यावेळीही आमच्या चर्चेचा विषय "संगीत" हाच असतो. अनेक कलाकारांच्या गाण्यातील गुण-दोषांविषयी चर्चा व्हायच्या, त्यातून गाणे किंवा साथ संगत कशी असावी किंवा नसावी हे कळून यायचे. हे एक शिक्षणच आहे. आपल्या सादरीकरणाविषयी सुद्धा त्यातून बोध होत असतो. या चर्चेत एखाद्या कलाकाराच्या चुका काढणे हा उद्देश नसायचा, परंतु त्याने केलेली चूक आपल्या हातून होऊ नये याची काळजी घेतली जायची.

"शिवानंद" संगीत प्रतिष्ठान मध्ये आम्ही दोघेही ट्रस्टी होतो. एखादे काम करायचे म्हणजे ते रीतसरच झाले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असायचा. कामाची यादी, त्याची

विभागणी ,इत्यादी गोष्टींची ते खूप काळजी घेतात. सुरेशजींना कामाविषयीचा प्रचंड उत्साह. विद्यार्थ्यांच्या गुरु पौर्णिमेच्या कार्यक्रमात प्रत्येक वर्षी प्रत्येकाकडून वेगवेगळ्या बंदिशी ते बसवून घेतात. सगळे शिष्य वेगवेगळे मॅटर वाजवतात. कायदा तोच असेल पण त्याचे प्रकार किंवा वाजवण्याची पद्धत वेगळी असते. त्यातूनच मोठा कलाकार घडण्याची प्रक्रिया सुरू होते.

बांगलादेशमधील ढाक्याला जायचो तेव्हा आम्ही दहा वाजता हॉलमध्ये हजर असायचो पण ते नऊ वाजताच जाऊन बसायचे. खरे तर तिथे तशी खूप तयार मुले नव्हती, पण तरीही या मुलांवर मेहनत घेण्यासाठी ते कटिबद्ध असायचे. त्यामुळेच आजचे सांगीतिक चित्र बघता इतक्या मोठ्या प्रमाणात त्यांचे शिष्य तयार आहेत.

तालयोगी आश्रमाच्या माध्यमातून त्यांनी पखवाज वाजवणारी खूप मुले तयार केली आहेत. पखवाज शिकणारी मुले फक्त भजनाचीच साथ न करता त्यांचेही एकल वादन उत्तम व्हावे याकडे सातत्याने त्यांचं लक्ष असतं. सुरेशजींनी महाराष्ट्रातील व देशातील ग्रामीण भागातून आलेल्या प्रतिभावंत मुलांवर संस्कार केल्याने ते आता चांगले कलाकार म्हणून नावारूपाला येत आहेत. सुरेशजींचा झपाटा, उत्साह खूप दांडगा आहे. मुलांना शिकवण्याची मुळात त्यांना आवड आहे आणि म्हणून ते चांगले गुरु आहेत.  शिष्यांना खूप वेळ द्यावा लागतो मेहनत करावी लागते, तेव्हा शिष्य तयार होतात.

सुरेशजींनी आपल्या वादनात सतत काळानुसार खूप प्रगल्भता आणली आहे. त्यात अनेकदा पाहिजे तसे बदल त्यांनी केले. असे होणे ही चांगली गोष्ट असते. एकदा भीमसेनजी म्हणाले होते की,'दर पंधरा - वीस वर्षांनी आपल्या सादरीकरणात बदल होत असतो'  कारण तेवढा अनुभव आपल्या पाठीशी येत असतो. नवनवीन गोष्टींची उकल व्हायला लागते. विद्यार्थ्यांना शिकवताना आपल्यालाही अनेक गोष्टी नव्याने समोर येतात. विद्या जेवढी जास्त आपण देतो तेवढी ती स्वतःमध्ये प्रगल्भतेने वाढते.

प्रयोगशीलता हा गुण त्यांनी खूप उत्तमरित्या जोपासला आहे. 'जोडराग' व 'रागमाला'

सारख्या संकल्पना त्यांनी स्वतंत्र तबलावादनात ‘जोडताल’ आणि ‘तालमाला’ या स्वरूपात प्रस्थापित केल्या. हा विचारच नाविन्याची कास धरणारा आहे आणि म्हणूनच पारंपारिक तबलावादनात नवतेची जोड देण्याचे कार्य त्यांच्या शिष्यांकडून सुद्धा घडले जात आहे. एकल वंदन करतांना सुरेशजींनी बंदिशी गायनाचा नागम्यासाठी प्रथम प्रयोग केला त्यामुळे तबलावादन श्रोत्यांना समजायला अधिक सोपे झाले.

आपल्या सादरीकरणाला स्वतःची नजर व स्वतः चा विचार यातून गुरु तुम्हाला पुढचे रस्ते दाखवितात. पुढे चालायचे काम तुमचे आहे .गुरु मार्ग दाखवतात, दर्शन तुम्हाला घ्यायचे असते. शिष्याने संगीतामध्ये स्वतःची ओळख निर्माण करावी, अशा तऱ्हेचं व्यक्तिमत्व शिष्याचं बनावं यासाठी गुरु प्रयत्नशील असतो. हाच विचार सुरेशजींच्या शिकवण्यात सातत्याने दिसतो, म्हणून सुरेशजींचे ”तालयोगी आश्रम” हे गुरुकुल या पार्श्वभूमीवर खूप महत्त्वाचे आहे. गुरुकुलाच्या माध्यमातून गेली एक तप ते शिष्यांना विद्या देत आहेत.

एक मित्र व एक कलाकार म्हणून मी त्यांच्या तालयोगी आश्रमाच्या तप-पूर्ती निमित्त आणि सुरेशजींच्या अमृत महोत्सवा निमित्त परमेश्वराजवळ प्रार्थना करतो की, त्यांच्याकडून असेच नवनवीन प्रयोग सादर व्हावेत व यातून तयार होणारी पिढी अभिजात भारतीय संगीताला पुढचे आयाम देणारी ठरावी या माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

---

बतमी लेखासोबत

तालयोगी आश्रमाच्या तप-पूर्ती निमित्त आणि सुरेशजींच्या अमृत महोत्सवा निमित्त येत्या ४ एप्रिल २०२३ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे सायंकाळी ६ वाजता श्री सत्यजित तळवलकर यांचे एकल तबला वादन आणि पं. उल्हास कशाळकर यांचे गायन असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास जगतगुरु शंकराचार्य

**विद्यानृसिंह भरती व विद्या वाचस्पती श्री शंकर अभ्यंकर यांची पवित्र उपस्थिती लाभणार आहे तरी सर्वांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे.**

---